शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे
19 NOV 2019
आवक क्रमांक 13787
शाखा 202

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अंनियो २०१८/प्र.क्र.१४४/टिएनटी-६
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय :- **सानुग्रह अनुदानाची रक्कम अदा करणेबाबतची तपासणी सूची.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस असे कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाने दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास द्यावयाच्या सानुग्रह अनुदान लाभ देण्याबाबत निर्णय घेतला आहे.

२. शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव तातडीने निकाली निघण्याच्या दृष्टीने संबंधित शाळेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी परिपूर्णरित्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) तसेच शिक्षण निरीक्षक स्तरावरच होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रस्ताव तपासून सोबतच्या तपासणी सूचीनुसार दर्शनी भागावर पृष्ठ क्रमांक दर्शवून सादर करावा.

३. सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव आपल्या अभिप्राय व शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यात यावा.

वमिकरंदीकर
(व.मि.करंदीकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : तपासणी सूची

Scanned with CamScanner

त्र क्रं.१
लेखा-

## सानुग्रह अनुदान प्रकरणी प्रस्तावाची छाननी/पडताळणी करण्याकरिता तपासणी सुची

| अ.क्र. | तपासणी सूची | होय/नाही | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सानुग्रह अनुदानास्तव प्राप्त प्रस्ताव शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट २०१९ नुसार सादर केलेला असावा | | |
| २. | मृत्युच्या दाखलयाची (मूळ प्रत) | | |
| ३. | वारस प्रमाणपत्र (मूळ प्रत) | | |
| ४. | संबंधीत कर्मचारी यांची शाळेतील प्रथम नियुक्तीची नोंद असलेल्या पानांची साक्षांकित प्रत सोबत जोडलेली असावी. | | |
| ५. | सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची व प्रथम नियुक्तीची नोंद असलेल्या पानाची साक्षांकित प्रत सोबत जोडलेली असावी | | |
| ६ | परिभाषित अंशदान निवत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवत्तीवेतन योजनेतर्गत सभासद असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| ७. | नसल्यास सभासद करून का घेण्यात आले नाही त्याचे कारण सुस्पष्ट करावे आणि असल्यास अंतर्गत जमा असलेली रक्कम व शासन हिस्साची रककम परत करण्यात आली आहे किवा कसे. | | |
| ८. | शालार्थ क्रमांक व डिसीपीएस क्रमांक तसेच पान क्रमांक नोंदवावा | | |
| ९. | संबंधीत कर्मचाऱ्यांकडून शासकीय येणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १०. | संबंधीत कर्मचारी यांची शाळेतील कायम सेवा १० वर्षे पेक्षा कमी आहे. | | |
| ११. | नामनर्देशित व्यक्तिने/ वारसाने मागणी करावयाचा अर्ज (परिशिष्ट १) संपूर्ण भरलेले असावे. (मूळ प्रत) | | . |
| १२. | संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने अनुदान मंजूरीबाबत संचालकांस करावयाचा अर्ज (परिशिष्ट २) संपर्ण भरलेले असावे. (मूळ प्रत) | | |
| १३. | संबंधीत कर्मचारी यांचे धारण करीत असलेले पद १०० टक्के अनुदानित आहेत किंवा कसे. | | |
| १४. | शिक्षण उपसंचालकांनी प्रस्ताव व त्या सोबतचे दस्तावेज तपासून आपले अभिप्राय नोंदवून सादर करावा. | | |

Scanned with CamScanner